MS-CIT
World-class Comprehensive Computer Course

**Model Answer**
**Set- II**
**Std. – 10th MM/Semi**
**Subject – History H.L.**

MKCL KLiC Courses
Gateway to Knowledge Lit Careers

**Time : 2 Hrs.** **Marks : 40**

**प्र.१ अ) दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा:**

१) ड) रामलीला २) क) ठाकर ३) अ) सीमाँ-द-बोव्हो

**प्र.१ ब) पुढीलपैकी चुकीची जोडी लिहा.**

१) ३)चुकीची जोडी- ताराबाई शिंदे-द हाय कास्ट हिंदू वुमन
२) ४) चुकीची जोडी - मायकल फुको- इंग्रज इतिहासकार
३) २) चुकीची जोडी- बाबूराव पेंटर- कल्याणचा खजिना

**प्र.२ अ) पुढील तक्ता पूर्ण करा. (कोणतेही दोन)**

१) अ) लंगडी आ) कबड्डी इ) सागरगोटा ई) हॉकी उ) आट्यापाट्या
२) अ) आचार्य अत्रे आ ) घाशिराम कोतवाल इ) वसंत कानेटकर ई) टिळक आणि आगरकर
३) अ) शब्दकोश आ) सूची वाङ्मय इ) विश्वकोश ई) कोशसादृश्य वाङ्मय

**प्र.२ ब) पुढील संकल्पना स्पष्ट करा. (कोणतेही दोन)**

१) १) क्रिकेट सामन्यांचे मराठी भाषेतून समालोचन पूर्वी बाळ ज. पंडित करत असत.

२) आकाशवाणीवरून हे धावते वर्णन ऐकण्यासाठी लोक जीवाचा कान करत असत.

३) हे समालोचन करताना बाळ पंडित त्या मैदानाचा इतिहास, खेळाडूंचा इतिहास, खेळांशी संबंधित असणाऱ्या आठवणी आणि पूर्वीचे विक्रम यांची माहिती देत असत.

४) त्यांना खेळाचे आणि खेळाच्या इतिहासाचे उत्तम ज्ञान असल्यामुळे त्यांचे समालोचन रंजक व्हायचे.

२) १) 'प्रसारमाध्यमे' या शब्दांत 'प्रसार आणि माध्यमे' असे दोन शब्द आहेत.
२) प्रसार याचा अर्थ दूरवर पोहचवणे. एखादी माहिती आपण एखाद्या माध्यमाच्या साहाय्याने दूरवर पोहचवू शकतो.
३) पूर्वीच्या काळी राजाला एखादी बातमी संपूर्ण राज्यात पोहचवायची असेल तर त्यासाठी कित्येक दिवस लागायचे.
४) पूर्वी गावोगाव दवंडी पिटवत असत. एकाकडून दुसऱ्याला व दुसऱ्याकडून तिसऱ्याला असा बातमीचा प्रसार व्हायचा.

३) १) ललित कला व्यक्तीने किंवा समुदायाने सादर करण्याचे स्थान म्हणजे रंगभूमी.
२) तंजावरच्या भोसले राजवंशाने मराठी व दक्षिणात्य भाषांमध्ये नाटकांना उत्तेजन दिले.
३) विष्णुदास भावे मराठी रंगभूमीचे जनक म्हणून ओळखले जातात.
४) सीतास्वंयवर हे त्यांनी रंगभूमीवर आणलेले पहिले नाटक होय.
५) त्यानंतर महाराष्ट्रात ऐतिहासिक, पौराणिक नाटकांबरोबरच हलक्याफुलक्या पद्धतीची प्रहसन प्रकारातील नाटकेही रंगभूमीवर आली.
६) त्यामध्ये विनोद पद्धतीने सामाजिक विषय सादर केले गेले.
७) थोरले माधवराव पेशवे या नाटकापासून संपूर्ण नाटकापासून संपूर्ण लिखित संहिता असलेल्या नाटकांची नवी परंपरा सुरु झाली.

**प्र.३ पुढील विधाने सकारण स्पष्ट करा. (कोणतेही दोन)**

१) (१) आपल्या देशाला प्राचीन, मध्ययुगीन आणि अर्वाचीन अशा ऐतिहासिक स्थळांचा वारसा मिळाला आहे,

(२) त्याचबरोबर नैसर्गिक समृद्धीचा वारसाही आपल्याला लाभलेला आहे.

(३) संपूर्ण जगात गौरवली गेलेली काही महत्त्वाची स्थळे भारतात आहेत.

(४) ताजमहाल आणि जंतरमंतर वेधशाळेच्या बरोबरीने महाराष्ट्रातील अजिंठा वेरूळ, घारापुरी लेणी, छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, पश्चिम घाटातील कास पठार यांचा समावेश आहे.

(५) त्यामुळे पर्यटन स्थळांचे जतन करणे आवश्यक आहे.

२) (१) खेळणे ही माणसाची नैसर्गिक प्रवृत्ती आहे.

(२) मानवाच्या प्रारंभीच्या काळात विविध प्रकारचे खेळ खेळले जात.

(३) शिकार हा जसा उदरनिर्वाहाचा मार्ग होता तसाच तो खेळ व मनोरंजनाचाही एक भाग होता.

(४) भारतातील प्राचीन साहित्यात आणि महाकाव्यांमधून द्यूत, कुस्ती, रथांच्या आणि घोडयांच्या शर्यती आणि बुद्धिबळ या खेळांचे उल्लेख येतात.

३) १) भारताच्या प्राचीन काळ ते अर्वाचिन इतिहासाच्या संदर्भात दूरदर्शनवरून प्रसारित झालेली ‘भारत एक खोज’ ही मालिका महत्वाची आहे.
२) पंडित नेहरू यांच्या ‘डिस्कव्हरी ऑफ इंडिया’ या ग्रंथावर आधारित ही मालिका होती.
३) श्याम बेनेगल दिग्दर्शित मालिकेने प्राचिन काळ ते अर्वाचिन काळाचा सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय इतिहास मांडला.
४) सखोल संशोधन आणि सादरीकरण या पातळीवर ही मालिका सरस ठरली.

४) १) इसवी सनाच्या बाराव्या शतकातील सोमेश्वर या चालुक्य राजाने लिहिलेल्या 'मानसोल्लास' किंवा 'अभिलषितार्थ चिंतामणी' या ग्रंथात चित्रकथी परंपरेचे वर्णन आढळते.

२) त्यावरून या परंपरेच्या प्राचीनत्वाची कल्पना येते.

३) कठपुतळ्या किंवा चित्रांच्या साहाय्याने रामायण, महाभारतातील कथा सांगण्याची परंपरा म्हणजे 'चित्रकथी' परंपरा होय.

४) ही परंपरा कोकणातील कुडाळजवळच्या पिंगुळी गावातल्या 'ठाकर' आदिवासी समाजाच्या लोकांनी जपली आहे.

५) या परंपरेतील चित्रे कागदावर काढून नैसर्गिक रंगात रंगवलेली असतात.

६) नामशेष होण्याच्या मार्गावर असलेल्या या परंपरेचे पुनरुज्जीवन करण्याचे प्रयत्न सरकार आणि कलाकारांतर्फे केले जात आहेत.

**प्र.४ दिलेल्या उताऱ्याचे वाचन करुन त्यावर आधारित प्रश्नांची उत्तरे लिहा.**

१) उपयोजित इतिहास या संज्ञेसाठी " जनांसाठी इतिहास" (पब्लिक हिस्टरी) असा पर्यायी शब्दप्रयोग प्रचारात आहे.

२) भूतकाळातील घटनांसंबंधीचे जे ज्ञान इतिहासाद्वारे प्राप्त होते त्यांचा उपयोग वर्तमान आणि भविष्यकाळात सर्व लोकांना कसा होईल याचा विचार उपयोजित इतिहासात केला जातो.

३)

१) पर्यटनामुळे लोकांमध्ये इतिहाससंबंधीची आवड वाढीस लागते.

२) समाजमानामध्ये इतिहासाची जाणीव निर्माण होते.

३) त्यांच्या स्वतःच्या शहरात किंवा गावात असणाऱ्या प्राचीन स्थळांच्या आणि संवर्धनाच्या प्रकल्पामध्येही ते

सहभागी होऊ शकतात.

**प्र.५ पुढील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा. (कोणतेही दोन)**

१) १) स्त्रीवादीइतिहास लेखन म्हणजे स्त्रियांच्या दृष्टिकोनातून केलेली इतिहासाची पुनर्रचना.
२) सीमाँ-द-बोव्हा या फ्रेंच विदुषीने स्त्रीवादाची मूलभूत भूमिका मांडली.
३) स्त्रीवादी इतिहासलेखनामध्ये स्त्रियांचा अंतर्भाव करण्याबरोबर इतिहासलेखनाच्या क्षेत्रातील पुरुषप्रधान दृष्टिकोनांचा पुनर्विचार करण्यावर भर दिला गेला.
४) स्त्रियांच्या आयुष्याशी निगडित नोकरी, रोजगार, ट्रेड युनियन, त्यांच्यासाठी काम करणाऱ्या संस्था, स्त्रियांचे कौटुंबिक आयुष्य यांसारख्या विविध पैलूंचा सविस्तर विचार करणारे संशोधन सुरु झाले.

२) (१) ' दर्पण ' या पहिल्या मराठी पत्राचे संपादक या नात्याने बाळशास्त्री जांभेकरांना आद्य संपादक म्हटले जाते.

(२) त्यांनी मराठी भाषेतील पहिले वृत्तपत्र सुरु केले.

(३) दर्पणच्या अंकातील बातम्यांमधून आपणांस राजकीय, आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक इतिहास सापडतो.

(४) कंपनी सरकारच्या तीन इलाख्यांतील जमाखर्चाची यादी, या देशावर रशियान हल्ला होण्याचे भय, शहर साफ ठेवण्याकरिता मंडळींची नेमणूक, हिंदू विधवांचा पुनर्विवाह, कोलकाता येथे थिएटरची सुरवात. राजा राम मोहन रॉय यांची इंग्लंडमधील कामगिरी. यावरून तत्कालीन परिस्थितीवर भाष्य केले.

(५) ६ जानेवारी हा त्यांचा जन्मदिवस 'पत्रकार दिन ' म्हणून महाराष्ट्रात साजरा केला जातो.

३) १) इतिहासलेखन, भाषाशास्त्र, व्युत्पत्ती, व्याकरण अशा अनेक विषयांवर मूलभूत संशोधन करणारे आणि मराठी भाषेतून लेखन करणारे इतिहासकार म्हणून राजवाडे प्रसिद्ध आहेत.
२) आपला इतिहास आपण लिहिला पाहिजे, याचा पुरस्कार त्यांनी केला.
३) 'मराठ्यांच्या इतिहासाची साधने' असे शीर्षक असणारे २२ खंड त्यांनी संपादित केले.
४) त्यांतील त्यांच्या प्रस्तावना अत्यंत अभ्यासपूर्ण आहेत.
५) इतिहास म्हणजे भूतकालीन समाजाचे सर्वांगीण समग्र जीवन दर्शन.
६) केवळ राजकीय घडामोडी, सत्तांतरासाठी कटकारस्थाने आणि युद्धे यांच्याच हकिकती नव्हे. असे त्यांचे मत होते.
७) अस्सल कागदपत्रांच्या आधारे इतिहास लिहिला पाहिजे, असा त्यांचा आग्रह होता.

४) (१) कोशांमुळे वाचकापर्यंत ज्ञान पोचवले जाते, त्याची जिज्ञासा पूर्ण करण्याचा प्रयत्न केला जातो.

(२) एखाद्या मुद्द्याचा सविस्तर उलगडा केला जातो.

(३) वाचकाला त्याचा अभ्यास वाढवण्याची प्रेरणा मिळते.

(४) जे अभ्यासक संशोधक असतात त्यांच्यासाठी ज्ञानाचा पूर्वसंग्रह उपलब्ध करून देऊन त्यात अधिक भर घालण्याची संशोधन करण्याची गरज कोश निर्माण करतात.

(५) कोशवाङ्मय राष्ट्राच्या सांस्कृतिक अवस्थेचे प्रतीक असून समाजाची बौद्धिक व सांस्कृतिक गरज ज्या-ज्या प्रकारची असेल, त्या प्रकारच्या कोशवाङ्मयाची निर्मिती त्या त्या समाजात होते.

(६) कोशातील माहितीच्या मांडणीकरिता अचूकपणा, नेमकेपणा, वस्तुनिष्ठता, बांधीवपणा, आणि अद्ययावतता या गोष्टी आवश्यक असतात.

(७) अद्ययावतता राखण्यासाठी ठराविक काळाने कोशांच्या सुधारित आवृत्त्या किंवा पुरवण्या काढाव्या लागतात.

## राज्यशास्त्र

**प्र.६ दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पुन्हा लिहा.**

१) (अ) राखीव जागा २) (ब) डॉ . राजेंद्रसिंह राणा

**प्र.७ पुढील विधाने चूक की बरोबर ते सकारण स्पष्ट करा.**

१) हे विधान चूक आहे. भारतामध्ये सार्वजनिक क्षेत्रांत मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचाराची समस्या दिसून येते. राजकीय आणि प्रशासकीय स्तरावरील भ्रष्टाचारामुळे सरकारची कार्यक्षमता कमी होत आहे. निवडणूक प्रक्रियेमध्ये होणारा भ्रष्टाचार बनावट मतदान मतदारांना लाच देणे, पळवून नेणे यांसारख्या घटनांमुळे लोकांचा लोकशाही प्रक्रियेवरील विश्वास उडू शकतो.

२) हे विधान **चूक** आहे; कारण –
१) निवडणुका न्याय्य मार्गाने व्हाव्यात आणि त्या विश्वासार्ह असाव्यात.
२) खुल्या वातावरणात निवडणुका झाल्या नाहीत : तर निवडणूक प्रक्रियेत गैरप्रकार होतील, भ्रष्टाचार वाढेल.
३) प्रामाणिक आणि कार्यक्षम प्रतिनिधी निवडून येणे अशक्य होईल : म्हणून निवडणूक प्रक्रियेत गोपनीयता असू नये.

३) हे विधान **चूक** आहे ; कारण -
१) भारतीय निवडणूक आयोग हा राजकीय पक्षांच्या मान्यतेचे निकष निश्चित करुन, राष्ट्रीय वा प्रादेशिक पक्ष म्हणून मान्यता देत असतो.
२) संसद आणि विधिमंडळात मिळवलेल्या जागा आणि निवडणुकीत मिळालेल्या मतांची टक्केवारी यांचा या अटीत समावेश असतो.
३) शिरोमणी अकाली दल हा 'राष्ट्रीय पक्ष' म्हणून निश्चित केलेल्या अटीत बसत नाही. तो पंजाब राज्यापुरता मर्यादित व प्रभावी असल्याने या पक्षाला राष्ट्रीय नव्हे; तर प्रादेशिक पक्ष म्हणून आयोगाने मान्यता दिलेली आहे.

**प्र.८ अ) पुढील संकल्पना स्पष्ट करा.**

१) (१) राजकीय प्रक्रियेमुळे गुन्हेगारांचा वाढता सहभाग ही लोकशाही व्यवस्थेसमोरील एक गंभीर समस्या आहे.

(२) गुन्हेगारी पार्श्वभूमी, गुन्हेगारी स्वरूपाचे आरोप, भ्रष्टाचाराचे आरोप असलेल्या व्यक्तींना काही वेळा राजकीय पक्षांकडून उमेदवारी दिली जाते.

(३) त्यामुळे राजकारणामध्ये पैसे आणि गुंडगिरी यांचे महत्त्व वाढते.

(४) निवडणुकीच्या वेळी हिंसाचाराचा वापर होऊ शकतो.

२) १) भारताच्या संविधानाने प्रौढ मताधिकाराची तरतूद केलेली होतीच. त्यानुसार मताधिकारांची व्याप्ती मुळातच व्यापक होती.

२) मताधिकाराचा संकोच करणाऱ्या स्वातंत्र्यपूर्वकाळात प्रचलित असलेल्या सर्व तरतुदी नष्ट करून स्वतंत्र भारतात प्रत्येक भारतीय स्त्री पुरुषाला २१ वर्षे वयाची अट निश्चित करून मतदानाचा अधिकार संविधानाने दिला होता.

३) तो आणखी व्यापक करत मतदाराचे वय २१ वरून १८ वर्षे इथपर्यंत आणले.

४) स्वतंत्र भारतातील युवा वर्गाला यामुळे अर्थातच राजकीय अवकाश प्राप्त झाले.

५) अशा लोकशाहीची व्याप्ती वाढणाऱ्या बदलामुळे भारतीय लोकशाही जगातील सर्वात मोठी लोकशाही मानली जाते.

**प्र.८ ब) पुढील संकल्पना चित्रे पूर्ण करा. (कोणतेही एक)**

१) अ) भारतीय राष्ट्रीय काँग्रेस आ) भारतीय कम्युनिस्ट पक्ष

इ) भारतीय जनता पक्ष ई) भारतीय कम्युनिस्ट पक्ष (मार्क्सवादी)

उ) बहुजन समाज पक्ष ऊ) राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष

ए) तृणमूल काँग्रेस

२) (१) मतदार यादया तयार करणे, मतदार संघाची निर्मिती, उमेदवारांच्या अर्जांची छाननी, राजकीय पक्षांना मान्यता देणे, निवडणुकीसंबंधी वाद सोडवणे

(२) प्रत्यक्ष मतदान, मतदार यादीत नाव नोंदणी करणे.

(३) निवडणूक प्रचार, निवडणुकीसंबंधीच्या वादांचे निराकरण

**प्र.९ पुढील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही दोन)**

१) (१) भारतातील शेतकरी चळवळ ही एक अत्यंत महत्त्वाची चळवळ आहे.

(२) ब्रिटिशांच्या राजवटीत वसाहतिक काळातील सरकारच्या शेतीविरोधी धोरणांमुळे शेतकरी संघटित होऊ लागले.

(३) बारडोली, चंपारण्य, खोतीचा प्रश्न या शेतकऱ्यांच्या चळवळीविषयी तुम्हांला माहीत असेल महात्मा फुले, न्यायमूर्ती रानडे आणि महात्मा गांधी यांच्या विचारांमधून शेतकरी चळवळींना प्रेरणा मिळाली.

(४) हरितक्रांतीनंतर मात्र शेतकरी चळवळ अधिक क्रियाशील व परिणामकारक होऊ लागली. मात्र त्याचा फायदा गरीब शेतकऱ्यांना झाला नाही.

(५) याउलट शेतकऱ्यांमध्ये गरीब श्रीमंत असे वर्ग निर्माण झाले.

(६) त्यांच्यातील असंतोष वाढल्यामुळे शेतकऱ्यांच्या आंदोलनास सुरूवात झाली.

(७) शेतमालाला योग्य भाव मिळावा, शेतीला उद्योगाचा दर्जा मिळावा, स्वामिनाथन आयोगाच्या शिफारशी स्वीकाराव्यात, कर्जमाफी कर्जमुक्ती आणि राष्ट्रीय शेतीविषयक धोरण या शेतकरी संघटनांच्या प्रमुख मागण्या आहेत.

(८) शेतकरी संघटना, भारतीय किसान युनियन, ऑल इंडिया किसान सभा या भारतातील काही महत्त्वाच्या शेतकऱ्यांच्या संघटना आहे.

२) (१) अन्न, वस्त्र, निवारा ह्या मूलभूत गरजा आहेत.

(२) आपल्या देशात आर्थिक विषमता मोठ्या प्रमाणावर असल्याने अनेकांना निवारा उपलब्ध होत नाही.

(३) परिणामी महत्त्वाच्या शहरांमध्ये बकालवस्ती निर्माण झाली आहे.

(४) शहरांचे विदुषीकरण आणि घनकचऱ्याच्या समस्या निर्माण झाली आहे.

(५) यावर योग्य तोडगा काढण्यासाठी प्रत्येक भारतीय नागरिकाला निवाऱ्याचा हक्क मिळालाच पाहिजे.